# INDEX


| Sr. No | Date | Topic |
|---|---|---|
| 1 | 13/8/2022 to 15/8/2022 | Har Ghar Tiranga Abhiyan |
| 2 | 9/9/2022 | Blood Donation |
| 3 | 1/9/2022 to 30/9/2022 | National Nutrition Month |
| 4 | 17/12/2022 | De-addiction campaign |
| 5 | 25/01/2023 | National Voters Day |
| 6 | 14/3/2023 to 21/3/2023 | Clean village, healthy village and Labor Sanskar Camp |
| 7 | 19/2/2023 to 20/2/2023 | A Bone Setting and Alignment Treatment Camp: |

# Preface

The faculty and students of the College has conducted following extension activities either individually or with collaboration with NSS, NCC, etc.:

1. Har Ghar Tiranga abhiyan: Form 13-15 August 2022 this activity was organized along with NSS. In this duration tree plantation, Essay writing, singing competition conducted. Total 13 staff and 200 students participated.
2. Blood Donation: On 9/9/2022, this activity was organized along with PDMC. 20 staff present and 61 students donated blood; Total 171 people donated their blood.
3. National Nutrition Month: From 1-30 Sept 2022 this activity was organized along with NSS. Total 6 staff and 185 students participated.
4. De-addiction campaign: On 17/12/2022 lecture on de-addiction was organized along with NSS. Total 5 staff and 200 students participated.
5. National Voters Day: On 25/01/2023 this activity was organized along with NSS. Total 6 staff and 200 students participated.
6. Clean village, healthy village and Labor Sanskar Camp: From 14-21 March 2023 this activity was organized along with NSS. Total 6 staff and 100 students participated.
7. A Bone Setting and Alignment Treatment Camp: From 19-20 February 2023, this activity was organized along with NSS. Total 111 employees participated.

**डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन मध्ये**
**राष्ट्रीय सेवा योजना पथक द्वारा**
**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव “हर घर तिरंगा अभियान’’ उत्साहात साजरा**

कार्यक्रम प्रभारी : १) प्रा.प्रणाली लांडगे २) प्रा.वैभव बनकर

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक १३ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत उत्साहाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव “ हर घर तिरंगा अभियान’’ साजरा करण्यात आला.

दिनांक १३ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी तिरंगा वाटप व रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अजयपाल उपाध्याय, संस्थेच्या सचिव डॉ.माधुरी चेंडके, डॉ.उदय मांजरे, डॉ.विजय पांडे, डॉ.महेंद्र लोणकर, डॉ.मधुकर बुरनासे, डॉ.दिनानाथ नवाथे, डॉ.संजय तिरथकर, प्रा.नाहिद परवीन, प्रा. आगरकर मॅडम, प्रा.विलास दलाल, डॉ.शालिनी देवळे, प्रा.प्रतिक पाथरे तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रणाली लांडगे, प्रा.वैभव बनकर व मोठया संख्येने विद्यार्थी गण उपस्थित होते.

दिनांक १३ ऑगस्ट २०२२ रोजी डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन राष्ट्रीय सेवा योजना व युथ होस्टेल असोसिएशन ऑफ इंडीया यांच्या संयुक्त विद्यमानाने बॉस्केट बॉल ग्रॉउड जवळ वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनचे प्राचार्य डॉ.अजयपालजी उपाध्याय, उपप्राचार्य डॉ.एस.पी.देशपांडे, ॲड. अतुल भारद्वाज, YHA, श्री.दिलीप चेपे YHA, श्री.सतेज केचे, श्री.सचिन पेठे YHA, डॉ लक्ष्मीकांत खंडागळे, प्रा.दिपा वैद्य YHA, डॉ.किरण रहाणे, डॉ.महेंद्र लोणकर, डॉ.पाटील, डॉ.नवाथे, डॉ.येडे, डॉ.उदय मांजरे, डॉ.विजय पांडे, डॉ.बेलसरे तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. वैभव बनकर, प्रा.प्रणाली लांडगे व विद्यार्थी गण उपस्थित होते. यावेळी वृक्षारोपन व वृक्ष संगोपन करुन पर्यावरणीय समतोल राखला जाईल असे प्रतिपादन करण्यात आले.

मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयीन बॉस्केटबॉल ग्रॉउड परिसरात वृक्षारोपण करण्यात आले व उर्वरित वृक्ष विद्यार्थ्यांचे हस्ते महाविद्यालयामध्ये लावण्यात आले.

दिनांक १४ ऑगस्ट २०२२ रोजी ऑनलाईन निबंध स्पर्धा व देशभक्तिपर गीतगायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धा हिंदी, मराठी व इंग्रजी विषयामध्ये घेण्यात आली. निंबध स्पर्धेसाठी दिलेले विषय १) डिजिटल इंडिया:

Activate Windows
Go to PC settings to

विषयामध्ये घेण्यात आली. निंबध स्पर्धेसाठी दिलेले विषय १) डिजिटल इंडिया: कोविड १९ आणि त्यानंतरच्या संधी २) राष्ट्रीय विकासात विद्यार्थ्यांची भुमिका. निबंध स्पर्धा व देशभक्तिपर गीतगायन स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

दिनांक १५ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ६.४५ मिनिटांनी झेंडावंदनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी श्री.विलासराव मराठे, संचालक, दैनिक हिंदुस्थान, अमरावती यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. यावेळी संस्थेचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, प्राचार्य डॉ.अजयपाल उपाध्याय, डॉ.श्रीकांत चेंडके, डॉ. माधुरी चेंडके, उपप्राचार्य डॉ.एस.पी.देशपांडे तसेच शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

श्री.विलासराव मराठे व संस्थेचे प्रधान सचिव पद्मश्री वैद्य साहेबांनी विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन व संबोधिन केले.

# BLOOD DONATION CAMP



On 9th September 2022 Blood Donation Camp was organized in the memory of Late Ambadaspant Vaidya (Co-Founder, Shree Hanuman Vyayam Prasarak Mandal). In this organization volunteers from NSS unit of the college and many old members of HVPM contributed their efforts for making this social work successful. The team from PDMMC, Amravati Blood Bank and Sant Gadge Baba Blood Bank, Badnera came for the collection of blood.

This organization was successfully conducted by Dr. Madhukar Burnase under the guidance of Principal, Dr. A.P. Upadhyay, Vice-Principal Dr. S.P. Deshpande and HVPM's Secretary Dr. Madhuri Chendke. In total 171 people donated their blood on the day.

**राष्ट्रीय सेवा योजना पथक द्वारा**

**दिनांक १ ते ३० सप्टेंबर २०२२ या कालावधीत राष्ट्रीय पोषण महिन्याचे आयोजन**

कार्यक्रम प्रभारी : १) प्रा.प्रणाली लांडगे २) प्रा.वैभव बनकर

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक १ ते ३० सप्टेंबर २०२२ या कालावधीत राष्ट्रीय पोषण महिन्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात आले. दिनांक १९.९.२०२२ रोजी पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पोस्टर स्पर्धेचा विषय पोषण आहार, आरोग्य आणि हाताची स्वच्छता हा विषय दिला होता. स्पर्धेचे परिक्षक म्हणून कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, अमरावतीचे प्राध्यापक पी.एल.रामटेके आणि प्रा.करुणा बागडे यांनी केले. तसेच प्राचार्य ए.पी.उपाध्याय, उपप्राचार्य एस.पी.देशपांडे उपस्थित होते. स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांनी वरील विषयावर विविध पोस्टर बनवून पोषण आहार आणि स्वच्छता यावर समाजामध्ये जागृरकता निर्माण केली. दिनांक २१.९.२०२२ रोजी ''पोषण'' या विषयावर वेकल्पिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये १८५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दिनांक २३.९.२०२२ रोजी सकाळी १२ वाजता पोषण आहार या विषयावर पाककृती स्पर्धेमध्ये सादर केल्यात. या स्पर्धेसाठी डॉ. रसिका राजेणकर आहारतज्ञ रिमस हॉस्पिटल, अमरावती या परिक्षक म्हणून उपस्थित होत्या. दिनांक २३.९.२०२२ दुपारी २ वाजता ''महाविद्यालयीन विद्यार्थ्यासाठी पोषण आहार'' या विषयावर डॉ.रसिका राजणेकर आहारतज्ञ, रिमस हॉस्पिटल, अमरावती यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य डॉ.ए.पी.उपाध्याय, उपप्राचार्य डॉ.एस.पी.देशपांडे, आयक्युएसी प्रमुख डॉ.उदय मांजरे उपस्थित होते. सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला.

Activate Windo
Go to settings to

डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती

राष्ट्रीय सेवा योजना पथक द्वारा

## “व्यसनमुक्ती” विषयावर व्याख्यान

कार्यक्रम प्रभारी : १) प्रा.प्रणाली लांडगे २) प्रा.वैभव बनकर

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक १७ डिसेंबर २०२२ ला व्यसनमुक्ती विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. राजयोगी ब्रम्हकुमार प्रमोद भाई, “माझी शाळा व्यसनमुक्त शाळा, माझा भारत व्यसनमुक्त भारत” या अभियानाचे जिल्हा संयोजक, ब्रम्हाकुमारी विश्वविद्यालय यांचे व्याख्यान घेण्यात आले. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना तनावमुक्त जीवन, सकारात्मक जीवनशैली, स्वत:ची ओळख आणि सकारात्मक विचार करण्यासाठी आव्हान केले. व्यसनमुक्तीमुळे जीवनात आलेला तनाव कसा दूर करण्यात येवू शकतो यावर मार्गदर्शन केले. तसेच ध्यानधारणेचे प्रात्यक्षिक घेवून विद्यार्थ्यांना सक्रिय सहभाग नोंदविला. सर्व विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त जीवन जगण्याची शपथ घेतली. या व्याख्यानासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उदय मांजरे, परिक्षा नियंत्रक डॉ.विजय पांडे, ब्रम्हकुमार राजेश भाई, समाजसेवक, प्रा.प्रणाली लांडगे, प्रा.वैभव बनकर तसेच मोठया संख्येने राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन राष्ट्रीय सेवा योजने स्वयंसेवक ऋषिकेश मानकर आणि आभार प्रदर्शन गायत्री दुबे हिने केले.

Activate Wind
Go to PC settings t

डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती

राष्ट्रीय सेवा योजना पथक द्वारा

**“राष्ट्रीय मतदार दिन साजरा”**

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, विद्यार्थी परिषद व राष्ट्रीय सेवा योजना आणि योग विभागाच्या वतीने दिनांक २५ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १२ वाजता “राष्ट्रीय मतदार दिन” साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ.उदय मांजरे, डॉ.मधुकर बुरनासे, परिक्षा अधिकारी, प्रा.प्रणाली लांडगे, प्रा.वैभव बनकर, प्रा.संदिप निंघोट आदि मान्यवर राष्ट्रीय सेवा योजन अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रंसगी डॉ.बुरनासे यांनी मार्गदर्शन केले.

भारत निवडणूक आयोगाची स्थापना दिनांक २५ जानेवारी १९५० रोजी झाली आहे. भारत निवडणूक आयोगाचा ह्या स्थापना दिवस सन २०११ पासून संपुर्ण देशभरात राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. ह्यावेळी मतदारांना विशेषत: नवमतदारांना मतदार यादीत नांव नोंदणीसाठी प्रोत्साहन देण्यात आले. मतदाराचा निवडणूक प्रक्रीयेतील सहभाग वाढावा म्हणून त्यांच्यामध्ये जागरुकता निर्माण केल्या गेली. कार्यक्रमाचे संचालन प्रा.अभिलाषा पानझाडे आणि आभार प्रा. निंघोट यांनी केली. यावेळी सेवा योजनेच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिननिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी मतदानाविषयी जागरुकता निर्माण होण्याकरीता सामुहीक प्रतिज्ञा घेतली. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.वैभव बनकर व प्रा.प्रणाली लांडगे यांनी केले.

Activate Win
Go to PC settings

# स्वच्छ ग्राम, स्वस्थ ग्राम व श्रमसंस्कार शिबीर

## राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे स्वच्छ ग्राम, स्वस्थ ग्राम व श्रमसंस्कार शिबीराचे उद्घाटन संपन्न







दत्तक ग्राम रायपुर पांढरी विशेष श्रमसंस्कार शिबीराचे उद्घाटन

श्री हव्याप्र डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एजुकेशनचा स्तुत्य उपक्रम

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाद्वारा संचालित व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ द्वारा संलग्नित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन अमरावती मल्टीफॅकल्टी स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना पथका द्वारा आयोजित स्वच्छ ग्राम, स्वस्थ ग्राम व श्रमसंस्कार शिबीर दत्तग्राम रायपूर पांढरी, ता. भातकुली, जि. अमरावती येथे दि. १४-०३-२०२३ ते २१-०३-२०२३ दरम्यान आयोजित करण्यात आले.

शिबीराचे उद्घाटन १५-०३-२०२३ रोजी दुपारी ४ वाजता संपन्न झाले. कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून मा.किरणभाऊ पातुरकर, जिल्हा अध्यक्ष भा.ज.पा. अमरावती, कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय मांजरे, प्रमुख अतिथी प्रा.डॉ. संजय तिरथकर, श्री रामदासजी पानसे, श्री भरतरीनाथ गौरकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. वैभव बनकर, प्रा. प्रणाली लांडगे, डॉ. महेंद्र लोणकर, प्रा.डॉ. किरण राहणे, प्रा. मनोह कोहळे, डॉ. धनंजय विटाळकर, प्रा. संजय हिरोळे, प्रा. लक्ष्मीकांत खंडागळे, प्रा.डॉ. प्रमोद भालेराव, महाविद्यालयीन रा.से.यो. स्वयंसेवक प्रतिनिधी आदित्य चौधरी, खुशबू चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला.

उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक मा.श्री किरणभाऊ पातुरकर यांनी शिबीरातील विद्यार्थ्यांना शुभेच्छा देवून शिबीरा दरम्यान राबविण्यात येणाऱ्या स्वच्छ ग्राम व स्वस्थ ग्राम कार्यक्रमाकरीता केलेल्या नियोजनाची प्रशंसा केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उदय मांजरे यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, संयम, एकाग्रता व समायोजन शिबीराच्या माध्यमातून साधले जातात याबद्दल मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रणाली लांडगे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.डॉ. प्रमोद भालेराव यांनी केले. उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी उपस्थितीत मान्यवरांनी शिबीरातील विद्यार्थ्यांना शिबीराच्या यशस्वीते करीता शुभेच्छा प्रदान केल्या. कार्यक्रमाला उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार प्रा. मनोज कोहळे यांनी व्यक्त केले.

**शिबीरामधील सहभागी विद्यार्थी :-**



शिबीरामध्ये महाविद्यालयातीलज १०० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. तसेच एक पुरुष कार्यक्रम अधिकारी व एक महिला कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालयातील चार सहकारी प्राध्यापक व प्राध्यापिका यांचा सहभाग होता.

# शिबीरामध्ये घेण्यात आलेले विविध कार्यक्रम

**ग्राम स्वच्छता व स्वस्थ ग्राम उपक्रम :-**



शिबीरांतर्गत दि. १४-०३-२०२३ ते २१-०३-२०२३ दरम्यान रोज सकाळी ७ ते ९ दरम्यान ग्राम स्वच्छता कार्यक्रम राबविण्यात आला. यामध्ये शिबीरातील सहभागी विद्यार्थी यांनी तुकडोजी महाराज मंदिर, हनुमान मंदिर, शाळा व गावातील वेगवेगळ्या परिसरात जाऊन तेथील नागरीकांना सुद्धा यामध्ये सहभागी करुन ग्राम स्वच्छता केली व 'स्वच्छ भारत स्वस्थ भारत' असा संदेश गावकऱ्यांना श्रमदानाच्या माध्यमातून दिला तसेच रोज सकाळी गावातील काही तरुण मंडळी व शाळेतील विद्यार्थी यांना शारीरिक व्यायाम व कवायती त्याचसोबत योगासनाच्या माध्यमातून स्वस्थ ग्रामवासी बनविण्याकरीता रा.से.यो.स्वयंसेवकाच्या माध्यमातून सातत्यपूर्ण कार्यक्रम राबविला.

**ॲडव्हेंचर स्पोर्टस् व बुद्धीमत्ता खेळ :-**



शिबीरांतर्गत दि. १५-०३-२०२३ रोजी ॲडव्हेंचर स्पोर्टस् व मनोरंजनात्मक खेळ या विषयी मार्गदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असता ॲडव्हेंचर स्पोर्टस् या विषयावर प्रा.डॉ. उदय मांजरे, डी.सी.पी.ई.अमरावती यांनी ॲडव्हेंचर स्पोर्टस् याविषयी विद्यार्थ्यांनी माहिती दिली तसेच त्यासाठी लागणारे साहित्य यांचा उपयोग यासंबंधी प्रात्यक्षिक सुद्धा करुन दाखविले. तसेच बुद्धीमत्ता व मनोरंजनात्मक खेळ या विषयावर प्राचार्य डॉ. उदय मांजरे यांनी मार्गदर्शन केले व प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थ्यांकडून सुद्धा करवून घेतले. या प्रसंगी प्रा. डॉ. विजय पांडे (परिक्षा विभाग प्रमुख) उपस्थित होते.

## रक्तगट तपासणी शिबीर :-



शिबीरांतर्गत दि. १६.०३.२०२३ रोजी रक्तगट तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. रक्तगट तपासणी शिबीराकरीता गणेशदास राठी महाविद्यालयाचे प्रा.डॉ. घनश्यामजी बाहेती यांच्या माध्यमातून त्यांच्या सहकारी चमूच्या सहकार्याने रक्तगट तपासणी शिबीर घेण्यात आले असता शिबीरातील विद्यार्थी व गावकरी मंडळी मिळून जवळपास १५० लोकांनी रक्तगट तपासणी करुन रक्तगटाबद्दल माहिती जाणून घेतली.

## दंत चिकित्सा शिबीर :-



शिबीरांतर्गत दि. १६-०३-२०२३ रोजी दंत चिकीत्सा शिबीराचे आयोजन इंडियन डेंटल असोसिएशन चे डॉ. आदित्य मार्कंडेय, डॉ. अनुरुप काळे, डॉ. मुक्ता वानखडे, डॉ. कांचन भागवत, डॉ. ममता दादलानी यांच्या नेतृत्वात आयोजन करण्यात आले असता शिबीरातील विद्यार्थी व गावातील पुरुष व महिला मंडळींनी जवळपास १२० जणांची दंतचिकित्सा करण्यात आली व आवश्यकतेनुसार औषधांचे वाटप सुद्धा करण्यात आले तसेच डॉ. आदित्य मार्कंडेय यांनी दंत चिकित्सा व त्याचे आरोग्य सुदृढ राखण्याकरिता मार्गदर्शन सुद्धा केले.

## स्वयंरोजगार मार्गदर्शन कार्यक्रम :-



शिबीरा दरम्यान दि. १७-०३-२०२३ रोजी डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्यूकेशनचे प्रा. डॉ. प्रमोद भालेराव यांनी स्वयंरोजगार या विषयावर शिबीरातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच मार्केटींग क्षेत्रातील विविध कंपन्यांच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी प्राप्त करणे या विषयी माहिती दिली.

## कुंडलिनी जागृती व आत्मसाक्षात्कार (सहजयोग) :–



शिबीरांतर्गत दि. १७.०३.२०२३ रोजी परमपूज्य माताजी निर्मलादेवी अध्यासन केंद्राच्या वतीने डॉ. प्रताप उधवानी, बालरोग तज्ञ सहजयोग समिती, अमरावती यांनी 'कुंडलिनी जागृती व आत्मसाक्षात्कार' या विषयावर मार्गदर्शन करुन प्रात्यक्षिकाद्वारे प्रत्यक्ष अनुभूती करुन दिली. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा. पांडे उपस्थित होते. या कार्यक्रमाला उपस्थित सर्व प्राध्यापक, गावातील मंडळी व शिबीरातील विद्यार्थी यांनी स्वयं अनुभूती प्राप्त केली.

## सायबर क्राईम (महिला सक्षमीकरण) :–



शिबीरा दरम्यान दि. १८–०३–२०२३ रोजी प्रमुख वक्त्या कु. सिमा दाताळकर (पोलीस अधिक्षक अमरावतीत्र यांनी सायबर क्राईम या विषयावर विद्यार्थ्यांना व गावातील महिला, पुरुष मंडळींना मार्गदर्शन केले. या प्रसंगी प्रा. राजुभाऊ पिदळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## संमोहनातून उपचार :–



शिबीरांतर्गत दि. १८.०३.२०२३ रोजी सायंकाळच्या सत्रात डॉ. माधवजी दंडाळे संमोहन विशेषज्ञ यांच्या मार्गदर्शनात 'संमोहनातून उपचार' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना संमोहन एक उपचार या विषयी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे त्याची अनुभूती सुद्धा करुन दाखविली. कार्यक्रमाला गावातील मंडळीची सुद्धा उपस्थिती होती.

## एडस् जनजागृती :–



शिबीरांतर्गत दि. १६–०३–२०२३ रोजी अमरावती टी.बी. हॉस्पीटलचे कर्मचारी श्री नितीन बेदरकर यांनी एडस् जनजागृती या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यावेळी त्यांनी एडस् कशामुळे होतो, एडस् न होण्याकरीता कोणते प्रतिबंधात्मक उपाय केले पाहिजे व एडस् झालेल्या व्यक्तीसोबत जनसामान्यांचे वर्तन कसे असले पाहिजे या विषयी अवगत केले.

## योगा काळाची गरज :-



शिबीरांतर्गत दि. १९-०३-२०२३ रोजी योगा आजच्या काळाची गरज या विषयावर डॉ. अरुण खोडस्कर, योगतज्ञ डी.सी.पी.ई. अमरावती यांनी शिबीरार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या व्याख्यानामध्ये योगा रोज का केला पाहिजे ? दैनंदिन जिवनामध्ये योगाची काय आवश्यकता आहे, हे विद्यार्थ्यांना आपल्या भाषणाद्वारे संबोधीत केले.

## नेत्र तपासणी शिबीर :–



शिबीरा दरम्यान दि. १९.०३.२०२३ रोजी नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले असता महात्मे आय हॉस्पीटल, जिल्हा अंधत्व समिती यांच्या सहकार्याने घेण्यात आले.

गावातील वयोवृद्ध व तरुणांची नेत्र तपासणी करण्यात आली. शिबीरा दरम्यान शिबीरार्थी व गावकऱ्यांनी नेत्र तपासणी करुन घेतली. या शिबीराच्या सफल आयोजना करीता ह.व्या.प्र.मंडळाचे शालेय संचालक श्री राजेश महात्मे यांचे महत्वपूर्ण योगदान लाभले.

## रक्तदान शिबीर :–



शिबीरा दरम्यान दि. २०.०३.२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी डॉ. महेंद्र भुतडा, डॉ.अजय दातेराव, प्रा.राजेश पांडे तसेच डॉ. पंजाबराव देशमुख रक्तपेढीतील चमूचे महत्वपूर्ण योगदान लाभले. यावेळी शिबीरार्थींद्वारे २८ विद्यार्थ्यांद्वारे रक्तदान करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे संचालन प्रा.डॉ. मनोज कोहळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.किरण गायकवाड यांनी केले. यावेळी शिबीरा दरम्यान सर्व शिबीरार्थी व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनोरंजनात्मक रंगारंग कार्यक्रम, कॅम्प फायर :-



शिबीरा दरम्यान दररोज रात्री शिबीरातील विद्यार्थ्यांद्वारे मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम प्रस्तुत केले. तसेच गावातील बाल कलाकारांनी सुद्धा आपल्या कला प्रस्तुत केल्या व दि. २०.०३.२०२३ रोजी रात्री कॅम्प फायरचे आयोजन करण्यात आले असता विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य नाटक, गीत गायन, विविध वेशभूषा प्रस्तुत केली व संगीत रजनीचे सुद्धा आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला गावातील नागरीकांची सुद्धा फार मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## सायबर सिक्युरिटी विषयावर मार्गदर्शन :-



शिबीरा दरम्यान दि. २०.०३.२०२३ रोजी सायबर सिक्युरिटी या विषयावर डॉ. संजय येडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## विशेष उपक्रम

### गावकऱ्यां करिता घनकचरा निर्मुलन उपक्रम :




रायपूर पांढरी येथील ग्रामपंचायतच्या आवारात असलेल्या जागेवर ६ x ६ फुट रुंदीचा घनकचरा निर्मुलनासाठी खड्डा करण्यात आला. ज्यामध्ये ३ फुट खड्डा ओला कचऱ्यासाठी व ३ फुट खड्डा सुक्या कचऱ्यासाठी बनविण्यात आला. या घनकचरा खड्ड्यामुळे कचरा निर्मुलनाची गावकऱ्यांसाठी सोय करण्यात आली.

या घनकचरा निर्मुलन खड्ड्याच्या कार्याकरीता रायपूर पांढरी येथील समाजसेवक रामदासजी पानसे पाटील, तसेच पुनर्वसन हातुर्णा येथील सरपंच भरतरीनाथ गौरकर यांचे महत्वपूर्ण योगदान लाभले. त्यांनी घनकचरा निर्मुलन खड्ड्यासाठी जागा व साहित्य मिळवून दिले व रायपूर पांढरी येथील पोलीस पाटील सौ. जया पानसे पाटील यांनी ग्रामपंचायत आवारात घनकचरा निर्मुलन खड्डा करण्याकरीता अनुमती देवून गावातील व्यक्तींच्या समाजहिताचे कार्य करुन घेतले.

### स्वस्थ ग्राम विशेष उपक्रम :-



स्वस्थ ग्राम विशेष उपक्रमा अंतर्गत शाळेतील विद्यार्थी व गावातील मुलांकरीता शिबीरा दरम्यान दररोज योगासन, शारीरिक व्यायाम, पारंपारिक खेळ इत्यादींचे प्रशिक्षण देवून शारीरिक स्वास्थ्य सुदृढ बनविण्याकरीता विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला.

## शिबीरा दरम्यान सदिच्छा भेटी :-





शिबीरा दरम्यान डॉ. राजेश बुरांगे संचालक रा.से.यो.अमरावती विद्यापीठ, मा.श्री रविभाऊ राणा (आमदार बडनेरा मतदारसंघ), डॉ. अनिकेत आंबेकर, डॉ. लक्ष्मीकांत खंडागळे (शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डी.सी.पी.ई.अम.), प्रा. संजय तिरथकर, प्रा. मधुकर बुरनासे, डॉ. हसमुख भट्टी, डॉ. उदय मांजरे, प्रा. संजय इंगळे, डॉ. देवानंद सावरकर, डॉ. शिला चव्हाय, डॉ. विजय पांडे, प्रा. संजय मडावी, प्रा. नवाथे यांनी सदिच्छा भेट दिली.

## शिबीर समारोप :-





दि. २१.०३.२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता शिबीराचा समारोपीय कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. उदय मांजरे तसेच प्रमुख अतिथी डॉ. माधुरीताई चेंडके, सचिव श्री ह.व्या.प्र.मंडळ अमरावती तसेच मा.श्री सुनिलभाऊ खराटे, शहर अध्यक्ष शिवसेना अमरावती हे उपस्थित होते. यावेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. उदय मांजरे यांनी विद्यार्थ्यांना शिबीरामध्ये काय करणे आवश्यक आहे याची जाणीव करुन दिली.तसेच रा.से.यो.स्वयंसेवकांना शिबीरादरम्यान विविध उपक्रमांमध्ये जे कार्य केले त्याची प्रशंसा करुन त्यांना भविष्या करीता शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. प्रमोद भालेराव यांनी केले. तर शिबीराचा संक्षिप्त अहवाल प्रा. प्रणाली लांडगे यांनी प्रस्तुत केला. आभार प्रदर्शन प्रा. वैभव बनकर यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला पुनर्वसित हातुर्णा येथील सरपंच भरतरीनाथ गौरीकर तसेच रामदासजी पानसे व गावकरी मंडळी, प्रा. मनोज कोहळे, प्रा. शालिनी देवळे, प्रा. संजय हिरोळे, डॉ. धनंजय विटाळकर हे उपस्थित होते.

## शिबीर यशस्वीतेकरीता सहकार्य व योगदान :-

शिबीर यशस्वीतेकरीता श्री ह.व्या.प्र.मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री श्री प्रभाकररावजी वैद्य तसेच मंडळाच्या सचिव प्रा.डॉ. माधुरीताई चेंडके, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय मांजरे, उपप्राचार्य डॉ. एस.पी. देशपांडे, प्रा. संतोष इंगोले, रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी प्रा. वैभव बनकर, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रणाली लांडगे, प्रा. मनोज कोहळे तसेच गावातील ज्येष्ठ कार्यकर्ता श्री रामदासजी पानसे पाटील, हातुर्णा येथील सरपंच भरतरीनाथ गौरकर व गावकरी मंडळी तसेच समस्त प्राध्यापक वर्ग यांचे महत्वपूर्ण योगदान लाभले.

## Bone Setting and Alignment Treatment Camp



A Bone Setting and Alignment Treatment Camp were organized on February 19-20, 2023 in the Department of Yoga and Naturopathy in the college. This treatment camp was specially organized with the objective of creating health protection and health awareness among the teaching and non-teaching staffof the college. A total of 111 employees participated in this camp. Complications included neck pain, cervical spondylosis, back pain, low back pain, lumbar spondylosis, frozen shoulder, spondylolisthesis, vein congestion, tennis elbow, joint pain, arthritis, acidity, migraine (hemiplegia), etc. were treated and further recommendations were made.

PRINCIPAL
Degree College of Physical Education,
AMRAVATI. (M. S.)